गावकरी दि.17.9.25

# ग्रामीण पोलिसांकडून चोरीचे ३ गुन्हे उघडकीस; ५ आरोपी गजाआड

नांदेड / प्रतिनिधी



ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेळी, बकरी चोरी व खुपसरवाडी येथील हनुमान मंदिरातील घंटा चोरी असे ३ गुन्हे नांदेड ग्रमीण ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने उघड केले आहेत. यात ५ आरोपीना पकडून गजाआड केले आहे. यावेळी पथकाने ८५ हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त केला. जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाशकुमार यांनी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना आदेश दिले होते.

ग्रामीण पोलीस ठाण्यात शेळी, बकरी चोरी व खुपसरवाडी येथील हनुमान मंदिर मधील घंटा चोरीचे गुन्हे दाखल होते. ग्रामीण गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, पोलीस हवालदार वसंत केंद्र, पोलीस शिपाई विष्णू कल्याणकर, मारुती पचलिंग, संताप पवार यांचे पथक १५ सप्टेंबर रोजी पेट्रोलिंग करीत होते. पथकाला उपरोक्त गुन्ह्यातील आरोपी चोरीची दुचाकी घेऊन गाडेगाव रोडवर थांबले असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने तेथे छापा टाकून हनुमान मंदिर, बळीरामपुर येथील रहिवासी आरोपी सुलतान गुडूसाब शेख, महादेव मंदिर बळीरामपूर येथील आरोपी सय्यद इरफान इस्माईल, खुदबेनगर चौरस्ता येथील आरोपी शेख कलीम उर्फ गोरु शेख आजम, भोई गल्ली लोहा येथील आरोपी सुदाम कोंडाजी घोडके, युनुस नजीर कुरेशी यांना अटक केली. त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता हिंगोली बेथून १ दुचाकी चोरी केल्याचे सांगून वर नमूद केलेले गुन्हे केल्याचे कबूल केले. यावेळी लत्यांच्याकडून रोख १५ हजार ३०० रुपये व दुचाकी असा एकूण ८५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कामगिरीबद्दल ग्रामीण गुन्हे शोध पथकाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले आहे.